विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ५८ / २०२३

जास्तीचे वीज देयक दुरूस्तीबाबत

श्री. शामराव सखाराम धुमाळ
(ग्राहक क्र.१८४१००००७४६४/१८४१०३१३२९९५/१८४१०३१२३७८३) .... अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, केडगाव विभाग (महावितरण) .... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- शामराव सखाराम धुमाळ

प्रतिवादीतर्फे :-

१) संदीप दरवडे, कार्यकारी अभियंता
२) नितीन महाजन, उपकार्यकारी अभियंता

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख दिनांक :- १० ऑगष्ट २०२३

आदेश पारित दिनांक :- २७ सप्टेंबर २०२३

आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, बारामती परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २७ जुलै २०२२ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजी दाखल केले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

२. मंचाने तक्रारदार यांचे गाऱ्हाणे (क्रमांक १२/२०२१) दिनांक २७ जुलै २०२२ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

- *तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.*
- *प्रतिवादी महावितरण यांनी स्वखर्चाने ग्राहकाचे सर्व मीटर एकत्र करुन एकाच योग्य भाराप्रमाणे मीटर चेक करुन देण्यात यावा तसेच सदर वीज मीटर रिडींग विनाअडथळा घेता येईल अश्या योग्य ठिकाणी लावण्यात यावा.*

३. दिनांक १० ऑगष्ट २०२३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी हे व्यक्तिशः हजर होते तर प्रतिवादी महावितरण यांनी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे सुनावणीमध्ये भाग घेतला. अपिलार्थीच्या निवेदनातील प्रमुख मुद्दे व सुनावणीतील मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

अपिलार्थीनी नवीन वीज जोडणीसाठी केलेल्या वीज जोडणीचा सारांश खालीलप्रमाणेः-

तक्ता क्र. १

Sr. No.	Consumer No.	Name of Consumer	Address on Bill	Date of Supply	Purpose
1	184100007464	Dhumal Shamrao Sakharam	H. No.1488,Sai Nagar, A/P Karegoan, Tal - Shirur, Dist - Pune	05.08.2012	For Rooms given on Rental basis
3	184103132995	Smt. Dhumal Suvarna Shamrao	H. No.1488, A/P Karegoan, Tal - Shirur, Dist -Pune	26.06.2008	For Residential
2	184103123783	Smt. Suvarna Sharmaro Dhumal	S. No. 311 A/P Karegaon, Tal - Shirur, Dist - Pune.	02.06.2008	For Water pump

१) ग्राहक क्रमांक १८४१०००००७४६४

ग्राहक (क्रमांक १८४१०००००७४६४) हे ५ ऑगष्ट २०१२ पासून एलटी सिंगल फेज घरगुती ग्राहक आहेत. सदर वीज जोडणी भाडेतत्वावरील रूमसाठी वापरात असून माहे एप्रिल २०१६ पर्यंत वीज देयकाचा भरणा केलेला आहे. त्यानंतर सदर मीटरचे वीज देयक अचुक रिडींगनुसार मिळत नसल्याची वारंवार तोंडी तक्रार करुन ही महावितरणने फॉल्टी मीटरनुसार वीज देयक दिल्याने ग्राहकाने दिनांक १८ मे २०१६ च्या पत्राने प्रथम लेखी तक्रारी दिली व त्यानंतर ग्राहकाने आजतागायत वारंवार

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

तक्रारी करूनही तक्रारीचे योग्य ते निवारण झाले नाही. नोव्हेंबर २०१५ ते मे २०१६ च्या देयकात INACCSS / FAULTY असे नमुद करून दिलेल्या वीज देयकाचा सुध्दा ग्राहकाने भरणा केला.

दिनांक ९ ऑगष्ट २०१६ रोजी प्रथम फॉल्टी मीटर क्र.०१८२५८१७ च्या ठिकाणी मीटर क्र.०७६७६०८५ हा अपिलार्थीस कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांच्या गैरहजेरीत बसविला, परंतू कुठल्याही मीटरचा टेस्टींग रिपोर्ट अपिलार्थीस दिला गेला नाही. त्यानंतर मीटर क्र.०७६७६०८५ हा फास्ट रिडींग देत असल्याचे अपिलार्थींच्या निदर्शनास आल्यावर अपिलार्थीने दिनांक ३० सप्टेंबर २०१६ रोजी व दिनांक ४ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रतिवादीकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर मीटर क्र.०७६७६०८५ बदलून त्याठिकाणी मीटर क्र.१३२१३६२९ सुध्दा ग्राहकाच्या गैरहजेरीत दिनांक २ डिसेंबर २०१६ रोजी बसविला. प्रतिवादीने मीटर क्र.०७६७६०८५ टेस्टींगसाठी केडगाव विभागाकडे पाठविण्यात आला व त्यांच्याकडून दिनांक १६ जानेवारी २०१७ रोजी मीटर ओके असल्याचे अहवाल आला. सदर रिपोर्टवर दिनांक १ सप्टेंबर २०२१ रोजीची तारीख नमुद करून तो अपिलार्थीस दिला, परंतू अपिलार्थीस ते मान्य नाही. दिनांक २ डिसेंबर २०१६ रोजी बसविलेला मीटर क्र.१३२१३६२९ हा सुध्दा फास्ट रिडींग दत असल्याचे अपिलार्थींच्या निदर्शनास आल्यावर महावितरणकडे त्याबाबत वारंवार तक्रारी दाखल कल्यानतर सुध्दा मीटर बदली केला नाही. सदर मीटर टेस्टींगसाठी केडगाव विभागाकडे पाठविण्यात आला होता. परंतू सदर मीटरचा टर्मीनल जळालेला असल्या कारणाने मीटर टेस्ट करता येणे शक्य नाही असे दिशाभूल करणारे उत्तर दिले.

सदरच्या वीज देयकाचे अवलोकन केले असता प्रतिवादीने देयकात जोडलेली व्याजाची थकीत रक्कम ही पुर्णतः कमी करावी अशी अपिलार्थीची मागणी असतानाही आजतागायत कोणत्याही देयकात ती कमी करून दिली गेली नाही तरी रू.२७,५९०/- ही थकीत व्याजाची रक्कम कमी करून सुधारीत वीज देयके देण्यात यावे. सदरच्या सीपीएलचे अवलोकन केले असता मे २०१६ ते मार्च २०२१ पर्यतचे एकुण वापर १३६४२ केडब्लूएच रिडींग आहे व देयक रक्कम रू.८३,३७०/- एवढी आहे. तसेच मुख्य मीटरचा भार अपिलार्थीच्या ज्या रूमावर जोडलेला आहे त्या रूमवर सब मीटर लावलेले आहत. त्यामुळे सबमीटर व मिटरनिहाय घेतलेले मीटर रिडींग हे आपल्या सीपीएलचा रिडींगमधला ताळमेळ घेता मोठा फरक असल्याचे निदर्शनास आले. सीपीएल नुसार १३६४२ केडब्लुएच युनीट दर्शविते तर सबमीटर नुसार ९७०७ युनीट आहे, म्हणजे ३९३५ युनीट फरक असल्याचे स्पष्ट होते. सबब,

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

रू.२८,२४७/- ही रक्कम वीज देयकातून कमी होणे अपेक्षीत आहे. सबब सदर रक्कम सबमीटरप्रमाणे कमी होणे अपेक्षीत आहे. तसेच सदरहू मीटर (१३२१३६२९) च्या ठिकाणी दिनांक १२ मार्च २०२१ रोजी नवीन मीटर क्र.५३९८५६९७३६ लावण्यात आला त्या मीटरचा सुध्दा टेस्ट रिपोर्ट दिला नाही.

२) ग्राहक क्रमांक (१८४१०३१३२९९५)

ग्राहक क्रमांक (१८४१०३१३२९९५) एलटी रेसीडेंसीयल १ फेज दिनांक २६ जून २००८ रोजी घरगुती वापरासाठी बसविलेला असून ऑक्टोबर २०१८ पर्यंत म्हणजे गेल्या १० वर्षे प्रत्येक महिन्याला वीज देयक भरणा केलेला आहे. सदर मीटरचे वीज देयक अचुक रिडींगनुसार मिळत नसल्याची वारंवार तोंडी तक्रार करून ही महावितरणने फॉल्टी मीटरनुसार वीज देयक दिल्याने ग्राहकाने दिनांक ८ डिसेंबर २०१८ च्या पत्राने प्रथम लेखी तक्रारी दिली व त्यानंतर ग्राहकाने आजतागायत वारंवार तक्रारी करूनही निवारण झाले नाही.

दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी कार्यकारी अभियंता केडगाव यांच्यासोबत चर्चा केल्यावर सदर वीज देयक हे रिडींगप्रमाणे योग्य असल्याचे सांगण्यात आले व सदर वीज देयके भरून सहकार्य करण्याचे सांगण्यात आले. महावितरणने दिलेल्या माहितीचे अवलोकन करता सदरच्या सीपीएल नुसार माहे मे २०१६ ते जून २०२२ अखेर एकुण रिडींग १९६९६ युनीट वापर आहे व देयक रक्कम रू.१,२६,४२०/- एवढी आहे. तसेच अपिलार्थीच्या मुख्य मीटरचा भार ग्राहकाच्या ज्या अन्य रूमवर सोडला आहे त्या रूमवर लावलेले सब मीटर व मीटरनिहाय घेतलेले रिडींग हे प्रतिवादीने सादर केलेल्या रिडींगमध्ये मोठा फरक असल्याचे निदर्शनास आले. जसे सीपीएल नुसार मे २०१६ ते जून २०२२ अखेर एकुण रिडींग १९६९६ युनीट आहे तर सब मीटरनुसार एकुण रिडींग १३०४० युनीट एवढी आहे, म्हणजे ६२८२ युनीट एवढया जादा युनीटची आकारणी महावितरणने देयकात केली. त्यामुळे रू.४९,१०२/- एवढी रक्कम अपिलार्थीच्या देयकातून कमी होणे अपेक्षीत आहे. तसेच अपिलार्थीच्या देयकात जोडलेली व्याजाची थकीत रक्कम ही पुर्णतः कमी करण्याबाबतची अपिलार्थीची मागणी होती परंतू आजतागायत सदर व्याज रक्कम वजा न करता वीज देयके दिल्याने अपिलार्थीस ते मान्य नाहीत, त्यामुळे अपिलार्थीने रू.३२,३४७/- व्याजाची रक्कम पुर्णतः वजा करून सुधारीत वीज दयके ग्राहकास तात्काळ देण्याची मागणी केली.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

३) अपिलार्थीने नमुद केले की, कार्यकारी अभियंता केडगाव यांच्या आश्वासनानुसार रू.५०,०००/- चा ऑनलाईन पध्दतीने भरणा केला. त्यानंतरही माहे जुलै २०२१ ते जानेवारी २०२२ पर्यंत प्रत्येकी रू.५,०००/- प्रमाणे एकुण रू.७०,०००/- दोन्ही फॉल्टी मीटरच्या देयकापोटी भरणा केलेला आहे. परंतू ऑनलाईन वीज देयक भरणा करताना संगणक जादा रक्कमेची मागणी करीत असल्याने फेब्रवारी २०२२ पासून वीज देयकांचा भरणा बंद केला, याबाबत प्रतिवादींना दिनांक २९ डिसेंबर २०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे.

४) अपिलार्थीने नमुद केले वीज देयकात खालीलप्रमाणे सुट देण्यात यावी.

तक्ता क्र. २

ग्राहक क्र	१८४१००००७४६४	१८४१०३१३२९९५
जून २०२२ अखेर व्याजाची थकबाकी (रू.)	२७,५९०/-	३२,३४७/-
मीटर व सबमीटर प्रमाणे फरकाची रक्कम (रू.)	२८,२४७/-	४९,१०२/-
	५५८३७/-	८१४४९/-

५) ग्राहक क्रमांक (१८४१०३१२३७८३)

ग्राहक क्रमांक (१८४१०३१३२७८३) एलटी रेसीडेंसीयल १ फेज दिनांक २ जून २००८ रोजी घरगुती पाणी मीटरसाठी बसविलेला असून जून २०२१ पर्यंत म्हणजे गेल्या १३ वर्षे प्रत्येक महिन्याला वीज देयक भरणा केलेला आहे. परंतू महावितरणने जाणिवपुर्वक जुलै २०२१ च्या वीज देयकात जास्तीचे रिडींग दिल्याने ग्राहकाने दिनांक २३ ऑगष्ट २०२१ च्या पत्राने प्रथम लेखी तक्रारी दिली व त्यानंतर ग्राहकाने आजतागायत वारंवार तक्रारी करूनही निवारण झाले नाही.

माहे ऑगष्ट २०२१ चे रू.१६,१५०/- चे देयक ज्यादाचे रिडींग नमूद करून ग्राहकास दिले असता ग्राहक मागील देयकांचे व सदर मीटरवरील वापराचे अवलोकन करता सदर मीटर हा फॉल्टी असून फास्ट रिडींग देत असल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आल्याने त्याने तात्काळ मीटरची समक्ष तपासणी करून दुरूस्ती करण्याची मागणी केली. त्याअनुषंगाने प्रतिवादींनी फास्ट रिडींग देत असलेल्या मीटरची प्रत्यक्ष तपासणी करण्याऐवजी कार्यालयात बसून सदर मीटर योग्य रिडीग देत असल्याचे

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

दिनांक २३ ऑगष्ट २०२१ च्या पत्राने कळविले असून ते अपिलार्थीस मान्य नाही, कारण अपिलार्थीने दिनांक १६ ऑगष्ट २०२१ च्या केलेल्या तक्रारीनुसार माहे ऑगष्ट २०२१ ते नवीन मीटर बसविण्यापर्यंत म्हणजे दिनांक २१ डिसेंबर २०२१ पर्यंत दिलेली वीज देयके ही पुर्णतः फास्ट रिडींग पध्दतीने दिलेली असल्याने अपिलार्थीस ती मान्य नाहीत.

तसेच सदर मीटर जळाल्याने त्या ठिकाणी दिनांक २१ डिसेंबर २०२१ रोजी नवीन मीटर क्र.०७६४३०८८१२४ बसविण्यात आलेला असून सद्या तो मीटर योग्य रिडींग देत आहे. सबब याबाबत अपिलार्थीची कोणतीही तक्रार नाही. सुनावणी दरम्यान अपिलार्थीने या वीज जोडणी तक्रार मागे घेतली आहे.

६) महावितरणच्या संबधित कार्यालयाकडे वारंवार तक्रारी करूनही गाऱ्हाण्याचे निवारण झाले नाही म्हणून दिनांक १६ जुलै २०२१ रोजी न्याय मिळण्याच्या उद्देशाने अंर्तगत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) तक्रार दाखल केली. कक्षाने दिनांक २७ सप्टेंबर २०२१ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

- ग्राहकाचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे
- ग्राहकाने मागणी केल्यास व आवश्यक चार्जेस भरणा केल्यास ग्राहक क्र.१८४१०००७४६४ व ग्राहक क्र.१८४१०३१३२९९५ या कनेक्शनसाठी सध्याचा जोडलेला मीटर टेस्ट करून त्याची प्रत तक्रारदारास दयावी व त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.
- तक्रारदार यांनी सदर परिशिष्ठ 'क्ष' अन्वये अंर्तगत ग्राहक क्र.१८४१०३१३२७८३ विषयी तक्रार केली नसल्याने अंर्तगत तक्रार निवारण प्रणाली अंर्तगत स्वतंत्र तक्रार दाखल करावी.
- ग्राहकाने नवीन ०३ वीज मीटर द्वारे वीज पुरवठयाची मागणी केली आहे व सदर नवीन वीज पुरवठा मागणी अर्जास संबधी महावितरणच्या तरतुदीची पुर्तता करून सदर ०३ ठिकाणी वीज पुरवठा करणेत यावा. नवीन बदली केलेले मीटर व मागणीनुसार केलेला मीटरच्या तपासणीचे अहवाल ग्राहकास देण्यात यावेत.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

७) कक्षाच्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून दिनांक ७ ऑक्टोबर २०२१ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक २७ जुलै २०२२ रोजीच्या आदेशान्वये तक्रार फेटाळली आहे. मंचाचे आदेश परिच्छेद क्रं. २ मध्ये विस्तृतपणे नमुद केलेले आहे.

८) मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून अपिलार्थीने दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजी विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्याकडे गाऱ्हाणे दाखल केले. अपिलार्थीने गाऱ्हाण्यात जास्तीचे वीज देयक रद्द करून सुधारीत वीज देयक व्याज माफ करून देण्यात यावे व त्याचा भरणा करण्यासाठी योग्य ते हफ्ते करून दयावे ही विनंती.

४. प्रतिवादीनी उत्तरात नमुद केलेले मुद्दे व दिनांक १० ऑगष्ट २०२३ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- ग्राहक क्र.१८४१००००७४६४ / १८४१०३१३२९९५ / १८४१०३१३२७८३ यांचा तक्रारीनुसार वीज देयकांचा गोषवारा खालीलप्रमाणे.

  १) ग्राहक क्र.१८४१००००७४६४

  अपिलार्थीनी ग्राहक क्र.१८४१००००७४६४ च्या मीटरचा मंजूर भार १ केडब्लू आहे तथापि, अपिलार्थीनी १० सब-मीटर नियमबाह्यपणे बसविलेले असून त्या सबमीटरद्वारे भाडेकरूंना वीज पुरवठा देत आहे. वरील भाडेकरूंचा वीज भार हा खुप जास्त असल्याने सदर कनेक्शनचे मीटर / टर्मिनल वारंवार जळत आहेत. ग्राहकाने जोडलेला अधिकचा जोड भाराबाबत वाढीव लोडची मागणी महावितरण रांजणगाव गणपती शाखा याच्याकडे केल्यास महावितरणच्या धोरणानुसार वीज देयक भरल्यावर त्याच्या वापराप्रमाणे वीज यंत्रणा अद्यावत करून त्यांना नवीन मीटर देता येऊ शकतात, जेणेकरून अधिकच्या जोडलेल्या भारामुळे मीटर जळाले असल्यास पुन्हा मीटर जळणार नाही.

  एप्रिल २०१६ मध्ये अपिलार्थीच्या जागेवर मीटर क्र. ५८०१८२५८१७ होता. सदरहू मीटर एप्रिल २०१६ ते ऑगष्ट २०१६ या कालावधीत सिपिएल वरील नोंदीप्रमाणे फक्त ५३ युनीट प्रति महिना याप्रमाणे बिलींग झाले आहे. सदर मीटर दिनांक ९ ऑगष्ट २०१६ रोजी नवीन मीटर क्र. ०७६७६०८५

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

बसविण्यात आला. सप्टेंबर २०१६ ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत मीटर रिडींग प्रमाणे वीज देयके देण्यात आली.

ग्राहक क्र.१८४१०००७४६४ चा मीटर नं.०७६७६०८५ फॉल्टी असल्याबाबतचा तक्रार अर्ज सप्टेंबर २०१६ मध्ये प्राप्त झाला होता त्या अनुषंगाने ग्राहकाचा मीटर बदलून जूना फॉल्टी मीटर तपासण्यात आला असता तो फॉल्टी नसून चांगला असल्याचे अहवाल आल्याने मीटर नं. ०७६७६०८५ चे काळातील वीज देयक बरोबर असल्याचे सिध्द होते, व सदर वीज देयक बरोबर असल्याचे अपिलार्थीस वेळोवेळी कळविले. त्यानंतर नोव्हेंबर २०१६ मध्ये ओव्हरलोडमुळे मीटरचे टर्मिनल जळाले.

ग्राहकाची वीज दुरूस्ती खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

तक्ता क्र. ३

Sr. No.	Consumer No.	Month of Billing	Meter No.	Bill Status	Action taken by MSEDCL	Consumer Status	Remark	Remarks
		Sep_2016 to Nov_2016	7607676085	Normal				Meter Terminal Burnt due to overload, hence meter (No. 7607676085) replaced by new meter (No. 7513213629) on 02.12.2016
1	184100007464 Dhumal Shamrao Sakharam	Dec_2016 Meter change	7513213629	RNA	Jan_2017 2 Months slabs	Live	Bill is Ok	
		Jan_2017		Normal	2 month slab	Live	Bill is Ok	
		Feb_2017 to Sep_2017		Normal		Live	Bill is Ok	
		Oct_2017		Faulty	**Oct_2017 to May_2018 Faulty average removed bill Revision ID 11910761**	Live	**Corrected Bill**	
		Nov_2017 To Dec_2017		Normal		Live		
		Jan_2018 to Feb_2018		Faulty		Live		
		Mar_2018		Normal		Live		
		Apr_2018		Faulty		Live		
		May_2018 to July_2018		Normal		Live	Bill is Ok	
		Aug_2018		Inacces	Sep_2018 2 Month Slab	Live	Bill is Ok	
		Oct_2018 to Dec_2018		Faulty	**Meter status faulty But TD Con. O Consumption**	TD	Bill is Ok	
		Jan_2019 To Mar_2020		Normal		TD	Bill is OK	
		Apr_2020 to Jan_2020		RNT	July_2020 2 Month Slab	TD	Bill is OK	
		July_2020 to Mar_2021		Normal		TD	Bill is Ok	Meter Terminal Burnt due to overload, hence meter (No. 7513213629) replaced by new meter (No. 5398569736) on 12.03.2021
		Apr_2021 to July 2023	5398569736	Normal			Bill is Ok	

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- वरील तक्त्याप्रमाणे ग्राहकाचे मीटर नं.०७६७६०८५ चे टर्मिनल जळाल्यामुळे नोव्हेंबर २०१६ मध्ये नवीन मीटर नं.७५१३२१३६२९ लावण्यात आला. त्या मीटरवर ऑक्टोबर २०१७ ते मार्च २०१८ व ऑक्टोबर २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीतील फॉल्टी स्टेटसने दिलेली वीज देयके दुरूस्त करून देण्यात आलेली आहेत. तसेच सदरहू मीटर ओव्हरलोडमुळे मीटर टर्मिनल जळाल्यामुळे मार्च २०२१ मध्ये बदलण्यात आला. ओव्हरलोडमुळे मीटर टर्मिनल जळाल्याने मीटर टेस्ट करणे शक्य नाही. आतापर्यंत अपिलार्थींना चुकीची दिलेली वीज देयके दुरूस्त करून देण्यात आली. तथापि अपिलार्थी वीज देयकाचा भरणा वेळेत करत नाही म्हणून थकबाकी दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

२) ग्राहक क्रमांक १८४१०३१३२९९५

ग्राहक (क्रमांक १८४१०३१३२९९५) हा सुवर्णा शामराव धुमाळ यांच्या नावे दिनांक २६ जून २००८ पासून असून सदर मीटरचा वापर अपिलार्थी घरासाठी / भाडेकरूसाठी वापर करत आहेत. सदर मीटरवर एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत नार्मल स्टेटसने वीज देयके देण्यात आली आहेत. जानेवारी २०१९ मध्ये फॉल्टी स्टेटसने वीज देयक देण्यात आली होती त्या वीज देयकांची दुरूस्ती करून देण्यात आली आहेत.

ग्राहकाची वीज दुरूस्ती खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

तक्ता क्र. ४

Sr. No.	Consumer No.	Month of Billing	Meter No.	Bill Status	Action taken by MSEDCL	Consumer Status	Remark	Remarks
3	184103132995 Smt. Dhumal Suvarna Shamrao	Apr_2018 to Dec_2018	7611070434	Normal		Live	Bill is Ok	
		Jan_2019		Faulty	Jan_2019 to Feb_2019 Faulty average removed Bill Revision ID 9967112	Live	Bill is Ok	
		Feb_2019 to Mar_2020		Normal		Live	Bill is Ok	
		Apr_2020 to Jun_2020		RNT	4 Month Slab July_2020	Live	Bill is Ok	
		July_2020 to Mar_2021		Normal		Live	Bill is Ok	
		Apr_2021 to May_2021		Normal		Live	Bill is Ok	
		Jun_2021 to July_2021		Inacces	3 Month Slab Aug_2021	Live	Bill is Ok	
		Aug_2021 to Feb_2022		Normal		Live	Bill is Ok	
		Mar_2022 to July_2023		Normal		Live	Bill is Ok	

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

सदयस्थितीत मीटर नं ७६११०७०४३४ गेली कित्येक वर्ष योग्य रितीने चालू आहे. एप्रिल २०१८ ते जुलै २०२३ पर्यंत फक्त जानेवारी २०१९ या एका महिन्यातच फॉल्टी स्टेटसने वीज देयक गेले होते ते वीज देयक दुरूस्त करून देण्यात आले आहे. उर्वरीत सर्व कालावधीत मीटरचे वीज वाचन 'नॉर्मल' आहे व आजतागायत मीटर व्यवस्थितीरत्या चालू आहे.

३) ग्राहक क्रमांक १८४१०३१२३७८३

सदर ग्राहक (क्रमांक १८४१०३१३२७८३) हा सुवर्णा शामराव धुमाळ यांच्या नावे असून तो एलटी रेसीडेंसीयल १ फेज दिनांक २ जून २००८ रोजी घरगुती पाणी मीटरसाठी बसविलेला आहे. या मीटरवर रिडींगनुसार वीज देयके देण्यात येत आहेत. ग्राहकाने दिनांक २३ ऑगष्ट २०२१ च्या पत्राने प्रथम लेखी तक्रारी दिली. सदर वीज देयकाची पडताळणी केली असता सदर वीज देयक हे मीटर रिडींगनुसार योग्य असून त्याबाबतचा मीटर रिडींगचा फोटो अपिलार्थीना पत्रासोबत पाठवण्यात आला होता.

ग्राहकाची वीज देयकांचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. ५

Sr. No.	Consumer No.	Month of Billing	Meter No.	Bill Status	Action taken by MSEDCL	Consumer Status	Remark
2	184103123783 Smt. Suvarna Sharmaro Dhumal	Apr_2018 to Mar_2019	6100364515	Normal		Live	Bill is OK
		Apr_2019 to Mar_2020		Normal		Live	Bill is OK
		Apr_2020 to Jun_2020		RNT	4 Month Slab July_2020	Live	Bill is OK
		July_2020 to Jan_2021		Normal		Live	Bill is OK
		Feb_2021 to Mar_2021		Inacces	3 Month Slab Apr_2021	Live	Bill is OK
		Apr_2021 to Mar_2022		Normal		Live	Bill is OK
		Apr_2022 to Mar_2023		Normal		Live	Bill is OK
		Apr_2023 to July_2023		Normal		Live	Bill is OK

- ग्राहकाचे तीन कनेक्शन हे एकाच जागेत, एकाच कारणासाठी आहेत. महावितरणच्या Condition of Supply मधील मुद्दा क्र.२.२.५ अन्वये एका जागेमध्ये एकाच पध्दतीच्या वापरासाठी एकापेक्षा जास्त वीज कनेक्शन देता येणार नाही असे नमुद केले. परंतू अपिलार्थीने वेगवेगळे नावे दाखवून तीन वेगवेगळी कनेक्शन वेगवेगळया नावाने घेऊन महावितरणच्या वीज दराची फसवणूक करून फायदा

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

उठवला. त्यामध्ये ग्राहक क्र. १८४१०३१३२९९५ / १८४१०३१३२७८३ हे सुवर्णा श्यामराव धुमाळ याच्या नावे आहेत.

- प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थीने जवळपास २० ते २५ रूम्स भाडयाने दिली आहेत, तक्रारीच्या काळामध्ये मीटर बसविले होते. दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी कार्यकारी अभियंता यांनी सदर ठिकाणी भेट दिली असता तीनही ग्राहकांची रू.१,७२,८००/- ची थकबाकी असल्याचे निदर्शनास आले.

- कक्षाच्या आदेशाप्रमाणे, अपिलार्थीच्या मागणीनुसार नवीन वीज कनेक्शन नव्याने देण्याचे आदेश दिले, त्यामुळे एकाच जागी सहा वीज जोडण्या अपिलार्थीस मिळाल्या. एकाच कारणासाठी सहा वीज जोडण्या मिळाल्यामुळे कंपनीचे महसुली नुकसान होत आहे.

- अपिलार्थीस सर्व मीटर तक्रार कालावधीत घराच्या कंपाऊंडमध्ये असल्याने रिडींग घेण्यासाठी कंपाउंडच्या आत जाऊन एका भिंतीवर असणाऱ्या मीटरचे रिडींग घ्यावे लागते किंवा थकबाकी संदर्भात कारवाई करण्यासाठी अपिलार्थीच्या जागेमध्ये महावितरणच्या कर्मचाऱ्यास व प्रतिनिधीस जावे लागते. थकीत वीज देयकाबाबत अपिलार्थीस विचारणा केली असता, अपिलार्थीने महावितरणच्या कर्मचाऱ्यास बेदम मारहाण केली आहे. अपिलार्थीवर रांजनगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये (दिनांक २२ जुन २०२१, फिर्यादि क्र.०२३४) फिर्यादि दाखल केली. तसेच दिनांक २७ जून २०२१ रोजी महावितरणच्या कर्मचाऱ्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल केला होता.

- सबब अपिलार्थीने दाखल केलेल्या सर्व तक्रारीचे वेळोवेळी निरसन केलेले आहे, त्यामुळे महावितरणची तक्रार महावितरणकडे प्रलंबित नाही तरीही अपिलार्थी हे त्यांच्यावर दाखल केलेल्या फिर्यादीमुळे पुर्व वैमनस्यातून त्रास देण्याच्या हेतूने वारंवार तक्रारी करत आहे.

- प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थीचे सर्व मीटरचे Clubbing करून ग्राहकाला वापरलेल्या वीज वापराची चुकीच्या पध्दतीने फायदा उठविल्यामुळे याची महावितरण कंपनीस रिकव्हरी करण्याचे आदेश प्राप्त व्हावेत. तसेच ग्राहकाचे मीटर, मल्टीमीटर बॉक्स पध्दतीने घराबाहेर घेण्याचे आदेश व्हावेत. सबब अपिलार्थीची तक्रार फेटाळण्यात यावी ही विनंती.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

विश्लेषण व निर्णय

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकुण घेतले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थीकडे तीन वीज कनेक्शनस असून त्याबाबतची सविस्तर माहिती तक्ता क्र.१ मध्ये दिलेली आहे. अपिलार्थींनी मंचाकडे त्यांचे गाऱ्हाणे दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ रोजी दाखल केले. मंचाने अपिलार्थीचे गाऱ्हाणे दिनांक २७ जुलै २०२२ च्या आदेशान्वये नामंजूर केले. त्यानंतर सदरहू आदेशाविरूध्द अपिलार्थीने ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२० मधील विनियम १९.१ अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०२२ या कालावधीपर्यंत येणे अपेक्षीत होते. तथापि अपिलार्थींनी दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजी म्हणजे जवळ जवळ ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधीनंतर विद्युत लोकपाल कार्यालयात गाऱ्हाणे दाखल केले. उशीर झालेल्या कालावधी अपिलार्थीकरीता माफ करण्यात येत आहे.

अपिलार्थींनी तीन ग्राहकांची तक्रार एकत्रित केली आहे त्याबाबतची सविस्तर माहीती तक्ता क्रमांक १ मध्ये दाखविली आहे.

६. **ग्राहक क्र.१८४१००००७४६४**

सदरहू वीज ग्राहक जोडणी (क्रमांक १८४१००००७४६४) ही एलटी सिंगल फेज दिनांक ५ ऑगष्ट २०१२ पासून आहे. ग्राहकाचा मंजूर भार फक्त १ केडब्लू आहे. तर अपिलार्थीने त्यावर अनधिकृतरीत्या सबमीटर बसविले आहे. सदरहू वीज पुरवठा भाडेतत्वावरील रूमसाठी वापरण्यात येते असल्याचे निदर्शनास येत आहे. वरील ग्राहकाचे खालील प्रमाणे मीटर बदलण्यात आले.

तक्ता क्र. ६

Meter No.	Remarks
7607676085	Meter Terminal Burnt due to overload, hence meter (No. 7607676085) replaced by new meter (No. 7513213629) on 02.12.2016
7513213629	Meter Terminal Burnt due to overload, hence meter (No. 7513213629) replaced by new meter (No. 5398569736) on 12.03.2021
5398569736	This meter is in service from 12.03.2021 onwards

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, ग्राहकाचा मंजूर भार फक्त १ केडब्लू असताना त्यावर जास्तीचा लोड टाकल्यामुळे सदरहू मीटर वारंवार जळत आहेत. वरील तक्त्यातील मीटर नं.०७६०७६७०८५ व नं.७५१३२१३६२९ हे मीटर टर्मिनल जळाल्यामुळे मीटर टेस्ट करणे प्रतिवादीना शक्य नव्हते असे प्रतिवादीने निदर्शनास आणून दिले. अपिलार्थीचा मीटर नं.५३९८५६९७३६ दिनांक १२ मार्च २०२१ पासून कार्यरत आहे. सदरहू मीटर अपिलाथीस टेस्ट करायचा असेल तर मीटर टेस्टींग चार्जेस अपिलार्थीने भरल्यानंतर प्रतिवादीने मीटर टेस्ट करून देणे क्रमप्राप्त आहे. अपिलार्थीने त्याबाबत प्रतिवादीशी संपर्क साधून मीटर टेस्ट करून घ्यावे.

प्रतिवादीन फॉल्टी स्टेटसने दिलेली वीज देयके तक्ता क्र ३ मध्ये दाखविल्याप्रमाणे दुरूस्ती केल्याचे नमुद केले आहे. सबब, अपिलार्थीस वापरलेल्या युनीटचेच वीज देयक देण्यात आले आहे.

- ग्राहक क्रमांक १८४१०३१३२९९५

सदरहू वीज ग्राहक जोडणी (क्रमांक १८४१०३१३२९९५) ही एलटी सिंगल फेज दिनांक २६ जून २००८ पासून सुवर्णा शामराव धुमाळ यांच्या नावे आहे. ग्राहकाचा मंजूर भार फक्त १.२ केडब्लू आहे. तक्ता क्रं.४ मध्ये दर्शविल्यानुसार सदर मीटर नं ७६११०७०४३४ चालू आहे. अपिलार्थीस मीटर नं. ७६११०७०४३४ टेस्ट करायचा असेल तर त्याचे टेस्टींग चार्जेस भरल्यानंतर प्रतिवादी टेस्ट करण्यास तयार आहेत व त्याबाबत प्रतिवादीशी संपर्क साधून मीटर टेस्ट करून घ्यावे. प्रतिवादीने फॉल्टी स्टेटसने दिलेल वीज देयक दुरूस्ती केल्याचे नमुद केले आहे. सबब, अपिलार्थीस वापरलेल्या युनीटचेच वीज देयक देण्यात आले आहे.

- ग्राहक क्रमांक १८४१०३१२३७८३.

सदर ग्राहक (१८४१०३१२३७८३) हा सुवर्णा शामराव धुमाळ यांच्या नावे असून तो एलटी रेसीडेंसीयल १ फेज दिनांक २ जून २००८ रोजी घरगुती पाणी पंपासाठी व लाईटींगसाठी वापरण्यात येत आहे. सदरहू मीटरबाबतची तक्रार अपिलार्थीने मागे घेतली आहे.

७. ग्राहक क्रमांक १८४१००००७४६४ व १८४१०३१२३९९५ वरील कनेक्टेड लोड हा मंजूर भारापेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास येते.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

८. अपिलार्थीनी मंचाकडे त्यांचे गाऱ्हाणे दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ रोजी दाखल केले. सबब, ग्राहक गाऱ्हाणे मंच व विद्युत लोकपाल, विनियम २०२० मधील कलम ७.८ नुसार अपिलार्थी हे भुतलक्षी प्रभावाने म्हणजे दिनांक २१ ऑक्टोबर २०१९ पासून (मागील दोन वर्षाचा कालावधी) फक्त गुणवत्तेवर बघता येईल. अपिलार्थीने २०१६ ते दिनांक २० ऑक्टोबर २०२१ हा कालावधी विनियमानुसार कालबाह्य आहे. विनियम ७.८ खालील प्रमाणे.

"कारवाईचे कारण उद्‌भवलेल्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या आत तक्रार दाखल केली नसेल तर मंच गाऱ्हाणे स्वीकारणार नाही."

अपिलार्थीस ग्राहक क्रमांक १८४१००००७४६४ व १८४१०३१२३९९५ चे दिनांक २१ ऑक्टोबर २०१९ पासून वीज देयके मीटरच्या वाचनाप्रमाणेच देण्यात आली आहेत. सबब, अपिलार्थीच्या तक्रारीत काही तथ्य नाही. वस्तूतः अपिलार्थीने मंजूर भारापेक्षा अनधिकृत वीज भार वाढवला असल्यामुळे मीटर वारंवार जळालेले निदर्शनास आले आहे. मीटर टेस्ट केले नाही म्हणून वीज देयके न भरण्याची सबब चुकीची आहे.

९. मंचाने त्यांच्या आदेशात या सर्व बाबींचा योग्य तो उहापोह केला आहे. मंचाचे आदेश तत्वतः मान्य करण्यात येत आहे. तथापि, मंचाच्या आदेशात खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

- प्रतिवादी महावितरणला निर्देशीत करण्यात येते की, मंचाकडे तक्रार दाखल केलेल्या तारखेपासून म्हणजे दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ पासून ग्राहक क्रमांक १८४१००००७४६४ व १८४१०३१२३९९५ यावरोल आकारलेले व्याज या आदेशाच्या तारखेपर्यंत माफ करण्यात यावे व अपिलार्थीस सुधारीत वीज देयके देण्यात यावी.
- सुधारीत थकबाकीची रक्कम (ग्राहक क्रमांक १८४१००००७४६४ व १८४१०३१२३९९५) ग्राहकास दहा समान मासीक हफ्त्यात प्रतिवादीकडे विनाव्याज भरण्याची मुभा देण्यात येत आहे.
- मासीक हफ्ता वेळेत न भरल्यास ग्राहकावर नियमानुसार व्याज व वीज पुरवठा खंडीत करण्याबाबतची कारवाई करण्याची प्रतिवादीस मुभा राहील.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- अपिलार्थीस आदेशीत करण्यात येते की, अनधिकृतरित्या वाढवलेला वीज भार मंजूर करून घेण्यात यावा तसेच प्रतिवादींना त्यांच्या दैनदिन नियमीत कामासाठी सहकार्य करावे.
- अपिलार्थीच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहे.
- अनुपालन अहवाल या आदेशाच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.